GOVERNMENT OF MAHARASHTRA
MAHARASHTRA STATE COMMON ENTRANCE TEST (CET) CELL
8th Floor, New Excelsior Building, A.K. Nayak Road, Fort, Mumbai 400 001
Tele. No. - 022-22016157/53/59 Website -www.mahacet.org E-Mail-cetcell@mahacet.org

No.MED-1025/C.R.No.90/NEET PG 2026/Registration & CAP -1/2480 Date : 16/10/2026

# NOTICE NO - 01
# NEET-PG-2026

## Admissions to Postgraduate Medical (MD/MS/Diploma) Courses for State Quota Seats in State Government/ Corporation/ State & Central Govt. Aided/ Unaided Private/Minority Medical Institutions situated in the State of Maharashtra for Academic Year 2026-27

## Process of Online Registration, Payment, Uploading of Scanned Original Documents, Preference Filling Process

Candidates who have appeared and qualified for NEET-PG-2026 examinations and desirous of applying for available seats of post graduate medical courses in State Government/ Corporation/ State & Central Govt. Aided/ Unaided Private and Minority Colleges situated in the State of Maharashtra, should fill and submit registration form online on website i.e.www.mahacet.org.

The information submitted in the registration form will be used for preparation of NEET-PG-2026 Maharashtra State Provisional Merit List. All the desirous candidates **(including NRI candidates, OMS candidates & In-service candidates)** submitting required credentials and completing payment successfully will be considered for subsequent process of admissions to available seats situated in the State of Maharashtra.

| Sr.No | Activity | Dates |
|---|---|---|
| 1 | Publication of Information Brochure for NEET PG-2026 | 16/10/2026 |
| 2 | Online Registration & Session apply for NEET PG-2026 (MD/MS) . It is mandatory to apply for session. | 17/10/2026 to 23/10/2026 upto 11.59 pm (server time) |
| 3 | Payment of Registration Fees (Non Refundable-Rs.3000/-) and Security Deposit (as applicable) through online payment gateway. **Candidates will be considered only after successful payment of Registration fee & Security deposit.** | 17/10/2026 to 24/10/2026 upto 05.00 pm (server time) |
| 4 | Uploading of colored scanned copy of all Original Requisite Documents on portal. **(Candidates who fail to upload requisite documents will not be considered for the admission process from the claimed category).** | 17/10/2026 to 24/10/2026 upto 11.59 pm (server time) |
| 5 | Document Verification through Online mode. ( However, the admission will be subject to submitting of original documents at the time of admission ) | 18/10/2026 to 27/10/2026 upto 11.59 pm (server time) |
| 6 | Publication of Registered Candidate List | 28/10/2026 |

| | | |
|---|---|---|
| 7 | Publication of Provisional Merit List | 28/10/2026 |
| 8 | Submission of Grievances, if any (Candidates need to submit necessary supportive document proof for making any correction. No changes will be entertained without supportive documents) | 29/10/2026 to 30/10/2026 |
| 9 | Publication of Final Provisional State Merit List & In-service State Merit List | 01/11/2026 |
| 10 | Publication of Seat Matrix for CAP Round -1 | 01/11/2026 |
| 11 | Online Preference/Choice Form Filling Process for CAP Round1.<br>(Candidates should verify the quota wise fees before filling the choice) | 02/11/2026 to 04/11/2026 upto 11.59 pm |
| 12 | Declaration of First Selection List (CAP Round-1) | 05/11/2026 |
| 13 | Physical Joining and Filling of Status Retention form with All Original Documents & Requisite Fees by DD/Cheque/Online mode at the allotted college. ( Cheque is allowed only on Holidays to be replaced by DD on next working Day). | 06/11/2026 to 10/11/2026 upto 05.30 pm |
| **The Schedule for subsequent CAP Round(s) will be declared in due course.** | | |

.The above schedule is subject to change as per the directions of various authorities like MCC / Central Government / State Government / Hon'ble Court.

<u>Important Instruction :</u>

- Candidates should ascertain his/her eligibility for admission to the desired courses before filling up the registration form.
- Candidates should read the information brochure carefully for eligibility, list of documents, Conduct of rounds, eligibility of each round and also for any other information regarding the admission process.
- Candidates should upload all the requisite original scanned documents to support their claim. It is mandatory to upload the documents. If documents are not uploaded the form will be rejected.
- PWD candidates should have claimed the quota at the time of NEET PG registration. They should submit Online PWD certificate issued by any one of the designated boards as declared by MCC.
- As per G.R. the candidates belonging to OBC & SEBC are allowed on the basis of receipt of for Caste Validity Certificate for 6 months. Other Categories (except ST)
- As per the Government Circular dated 04/09/2026, candidates belonging to the Scheduled Caste (SC), Vimukta Jati (VJ), Nomadic Tribes (NT), Other Backward Classes (OBC) and Special Backward Classes (SBC) categories have been granted an extension of three months from the date of the said Government Circular for submission of their Caste Validity Certificates for admission purposes.
- EWS certificate in State format as per the information brochure will only be accepted. EWS certificate in **central format will not be accepted** for the purpose of admission. Receipt of application of EWS will not be considered.
- As per G.R. of General Administration Department ROD-4019/C.R 31/ 16- A, dated 12 February 2019 and Government Resolution no. MED-1018/C.R 37/19/Edu- 2, dated 07th March, 2019. “EWS” means Economically Weaker Section include persons who are not covered under the scheme of reservation for SC, ST, DT-A, NT-B, NT-C, NT-D, OBC (Including SBC) & SEBC.

- Candidates belonging to reservation category must claim so in the application form before submitting the same.
- Candidates claiming reservation should ensure that they have all the necessary documents ready at the time of registration i.e Caste Certificate, Caste Validity certificate and Non Creamy Layer Certificate ( Wherever applicable)
- Any claim for converting from Open/General category to reserved category after submission of application form for registration shall not be entertained.
- Candidates who have passed UG from Outside Maharashtra and FMG candidates are eligible only for IQ seats of Private colleges. However, they will have to complete the registration as per the schedule above.
- Candidates need to pay the applicable fees at the college for physical joining. The fees shall be paid through DD. Payment of Fees through Cheque is allowed only on Bank Holidays. However, the cheque shall be replaced by DD on next working day. If the candidate fails to replace the Cheque with DD on next working day, the admission is liable to be cancelled and the candidate will himself be responsible for such a cancellation.
- NRI candidate should register on Foreign Candidate Registration Portal **before 22/10/2026** for verification of candidate's eligibility. The subsequent schedule will be as above.
- NRI candidates should note that they are eligible only for 15% Institute Quota as per merit.

All concerned candidates should visit the official website of the State CET Cell, www.mahacet.org, for further updates.

Sd-
Commissioner
Maharashtra State Common Entrance
Test (Cell), Mumbai

महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र.वैशिप्र-१०२६/प्र.क्र.९०/नीट पीजी २०२६/नोंदणी व प्रवेश फेरी वेळापत्रक/ २४८० दिनांक : १६/१०/२०२६

## सुचना क्रमांक - ०१
## नीट पीजी २०२६

**शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता महाराष्ट्र राज्यातील शासकीय / महानगरपालिका /शासन अनुदानित / विनाअनुदानित खासगी / अल्पसंख्याक वैद्यकीय संस्थांमधील पदव्युत्तर वैद्यकीय (MD/MS/Diploma) अभ्यासक्रमांच्या राज्य कोट्यातील जागांवरील प्रवेशाबाबत**

**ऑनलाइन नोंदणी, शुल्क भरणे, मूळ कागदपत्रांच्या स्कॅन केलेल्या प्रती अपलोड करणे व पसंतीक्रम भरण्याची प्रक्रिया**

नीट पीजी २०२६ परीक्षेस प्रविष्ट झालेले व उत्तीर्ण (पात्र) ठरलेले आणि महाराष्ट्र राज्यातील राज्य शासनाच्या / महानगरपालिका / शासन अनुदानित / विनाअनुदानित खासगी तसेच अल्पसंख्याक वैद्यकीय महाविद्यालयांमधील पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या उपलब्ध जागांसाठी अर्ज करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी www.mahacet.org या संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदणी अर्ज भरून सादर करावा.

नोंदणी अर्जामध्ये सादर केलेल्या माहितीच्या आधारे नीट पीजी - २०२६ ची महाराष्ट्र राज्याची तात्पुरती गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. आवश्यक माहिती व कागदपत्रे सादर करून तसेच शुल्काचा भरणा यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या सर्व इच्छुक उमेदवारांचा (अनिवासी भारतीय (NRI), महाराष्ट्राबाहेरील उमेदवार (OMS) व सेवांतर्गत उमेदवारांसह) महाराष्ट्र राज्यातील उपलब्ध जागांवरील प्रवेशाच्या पुढील प्रक्रियेसाठी विचार करण्यात येईल.

**ऑनलाईन नोंदणी व केंद्रिभुत प्रवेश फेरी १ चे वेळापत्रक**

| अ.क्र. | तपशिल | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| | नीट पीजी २०२६ प्रवेश माहिती पुस्तिका प्रसिध्द करणे | १६/१०/२०२६ |
| १ | ऑनलाईन नोंदणी व सेशन अप्लाय<br>सेशन अप्लाय करणे अनिवाय आहे. | १७/१०/२०२६<br>ते<br>२३/१०/२०२६<br>रात्री ११.५९ पर्यंत |
| २ | ऑनलाईन पेमेंट गेटवेद्वारे नोंदणी शुल्क (रुपये ३०००/- व लागू असलेली अनामत रक्कम भरणे. (यशस्वीरित्या शुल्क भरल्यानंतरच उमेदवाराची नोंदणी पूर्ण झालेली समजण्यात येईल.) | १७/१०/२०२६<br>ते<br>२४/१०/२०२६<br>सांय. ०५.०० पर्यंत |
| ३ | सर्व आवश्यक मूळ कागदपत्रांच्या रंगीत स्कॅन प्रती पोर्टलवर अपलोड करुन सबमिट करणे. (आवश्यक कागदपत्रे अपलोड व सबमिट न करणाऱ्या उमेदवारांचा दावा केलेल्या प्रवर्गातून प्रवेश प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.) उमेदवारांनी सर्व आवश्यक कागदपत्रे अपलोड केल्यांनतर सबमिट (Submit) बटनवर क्लिक करणे अनिवार्य आहे. तसे न केल्यास आपला अर्ज बाद करण्यात येईल | १७/१०/२०२६<br>ते<br>२४/१०/२०२६<br>रात्री ११.५९ पर्यंत |
| ४ | ऑनलाईन पद्धतीने कागदपत्रांची पडताळणी. तथापि, प्रवेशाच्या वेळी मूळ कागदपत्रे सादर करणे अनिवार्य राहील. | १८/१०/२०२६<br>ते<br>२७/१०/२०२६<br>रात्री ११.५९ पर्यंत |
| ५ | नोंदणीकृत उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे | २८/१०/२०२६ |
| ६ | तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिद्ध करणे | २८/१०/२०२६ |

| | | |
|---|---|---|
| ७ | हरकती / तक्रारी सादर करणे (असल्यास)<br>कोणतीही दुरुस्ती करण्यासाठी आवश्यक पुरावा कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. पुरावा कागदपत्रांशिवाय कोणताही बदल स्वीकारला जाणार नाही. | २९/१०/२०२६<br>ते<br>३०/१०/२०२६ |
| ८ | अंतिम तात्पुरती गुणवत्ता यादी व सेवांतर्गत उमेदवारांची गुणवत्ता यादी प्रसिद्ध करणे | ०१/११/२०२६ |
| ९ | प्रवेशासाठी उपलब्ध जागांचे वर्गीकरण प्रसिद्ध करणे | ०१/११/२०२६ |
| १० | ऑनलाईन पध्दतीने महाविद्यालय / अभ्यासक्रम निहाय प्राधान्यक्रम भरण्याची प्रक्रिया. पसंतीक्रम भरण्यापुर्वी उमेदवारांनी कोट्यानुसार लागू असलेल्या शुल्काची खात्री करुन घ्यावी. | ०२/११/२०२६<br>ते<br>०४/११/२०२६<br>रात्री ११.५९ पर्यंत |
| ११ | केंद्रिभुत प्रवेश फेरी-१ चा निकाल जाहीर करणे | ०५/११/२०२६ |
| १२ | मूळ कागदपत्रे व आवश्यक शुल्काच्या डिमांड ड्राफ्टसह (DD) वाटप झालेल्या महाविद्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून प्रवेश निश्चित करणे.<br>(बँकेच्या सुट्टीच्या दिवशी धनादेश (Cheque) द्वारे शुल्क भरण्यास परवानगी असेल. मात्र, पुढील कामकाजाच्या दिवशी तो डिमांड ड्राफ्टने (DD) बदलणे आवश्यक राहील. उमेदवाराने पुढील कामकाजाच्या दिवशी DD सादर न केल्यास त्याचा प्रवेश रद्द करण्यात येऊ शकतो.) | ०६/११/२०२६<br>ते<br>१०/११/२०२६<br>सायं. ०५.३० पर्यंत |

पुढील केंद्रिभुत प्रवेश फेरींचे वेळापत्रक योग्य वेळी जाहीर करण्यात येईल.

वरील वेळापत्रकात MCC / केंद्र शासन / राज्य शासन / मा. न्यायालय यांच्या निर्देशानुसार बदल होऊ शकतो. एमडीएस अभ्यासक्रमांच्या पुढील प्रवेश फेऱ्यांचे वेळापत्रक योग्य वेळी जाहीर करण्यात येईल. अद्ययावत माहितीसाठी उमेदवारांनी अधिकृत संकेतस्थळास नियमित भेट द्यावी.

**महत्वाच्या सुचना :**

- उमेदवारांनी नोंदणी अर्ज भरण्यापुर्वी इच्छित अभ्यासक्रमासाठी प्रवेशाची पात्रता स्वत: तपासून घ्यावी.
- उमेदवारांनी प्रवेश प्रक्रियेबाबतची पात्रता, आवश्यक कागदपत्रांची यादी, प्रवेश फेऱ्यांचे आयोजन, प्रत्येक फेरीसाठीची पात्रता तसेच प्रवेश प्रक्रियेबाबतची इतर आवश्यक माहिती जाणून घेण्यासाठी माहिती पुस्तिका काळजीपूर्वक वाचावी.
- उमेदवारांनी नोंदणी अर्जात केलेल्या आपल्या दाव्यानुसार सर्व आवश्यक मूळ कागदपत्रांच्या स्कॅन केलेल्या प्रती अपलोड कराव्यात. कागदपत्रे अपलोड करणे अनिवार्य आहे. आवश्यक कागदपत्रे अपलोड न केल्यास अर्ज नाकारण्यात येईल.
- दिव्यांग (PWD) उमेदवारांनी नीट पीजी २०२६ अर्ज भरताना दिव्यांग आरक्षणाचा दावा केलेला असणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी वैद्यकीय मंडळांपैकी (Medical Board) कोणत्याही एका मंडळाकडून निर्गमित केलेले PWD पात्रता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
- सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०२ जुलै २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार, OBC व SEBC प्रवर्गातील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठीच्या सहा महिन्यांच्या मुदतीसाठी अर्जाची पावती ग्राह्य धरण्याची तरतूद लागू आहे. (ST प्रवर्ग वगळून इतर प्रवर्गांबाबतची लागू तरतूद संबंधित शासन निर्णयानुसार विचारात घ्यावी.)
- दिनांक ०४/०९/२०२६ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार, अनुसूचित जाती (SC), विमुक्त जाती (VJ), भटक्या जमाती (NT), इतर मागासवर्ग (OBC) व विशेष मागास प्रवर्ग (SBC) या प्रवर्गातील उमेदवारांना प्रवेशाच्या प्रयोजनार्थ जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सदर शासन परिपत्रकाच्या दिनांकापासून तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे.
- EWS आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी वैध असलेले व महाराष्ट्र शासनाच्या विहित नमुन्यातील EWS प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. आवश्यक नमुना माहिती पुस्तिकेमध्ये उपलब्ध आहे. केंद्र शासनाच्या नमुन्यातील EWS प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही. EWS प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्याची पावती ग्राह्य धरली जाणार नाही.

- सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक ROD-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी २०१९ तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या शासन निर्णय क्रमांक MED-१०१८/प्र.क्र.३७/१९/शिक्षण-२. दिनांक ०७ मार्च २०१९ नुसार, "आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS)" म्हणजे अनुसूचित जाती (SC).अनुसूचित जमाती (ST), विमुक्त जाती-अ (DT-A), भटक्या जमाती-ब (NT-B), भटक्या जमाती-क (NT-C), भटक्या जमाती-ड (NT-D). इतर मागास वर्ग (OBC) (SBC सह) व सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग (SEBC) यांच्या आरक्षण योजनेत समाविष्ट नसलेल्या व्यक्ती.

- आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी नोंदणी अर्ज अंमित सादर करण्यापुर्वी संबंधित आरक्षित प्रवर्गाचा दावा अर्जात करणे आवश्यक आहे.

- आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी नोंदणीच्या वेळी जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र व लागू असल्यास नॉन-क्रीमी लेयर प्रमाणपत्र ही आवश्यक कागदपत्रे उपलब्ध असल्याची खात्री करून घ्यावी.

- नोंदणी अर्ज सादर केल्यानंतर खुल्या / सर्वसाधारण प्रवर्गातून आरक्षित प्रवर्गात बदल करण्याची कोणतीही विनंती स्वीकारली जाणार नाही.

- महाराष्ट्र राज्याबाहेरील विद्यापीठातून पदवीपूर्व (UG) शिक्षण पूर्ण केलेले उमेदवार तसेच परदेशी वैद्यकीय पदवीधर (FMG) उमेदवार केवळ खासगी महाविद्यालयांमधील संस्थात्मक कोट्यातील (Institutional Quota) जागांसाठी पात्र असतील. त्यासाठी त्यांनी वरील वेळापत्रकानुसार नोंदणी प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

- उमेदवारांनी प्रत्यक्ष प्रवेशाच्या वेळी संबंधित महाविद्यालयात लागू असलेले शुल्क भरावे. शुल्क डिमांड ड्राफ्टद्वारे भरणे अपेक्षित आहे. धनादेशाद्वारे शुल्क भरण्याची परवानगी केवळ बँकेच्या सुट्टीच्या दिवशी असेल. अशा वेळी पुढील कामकाजाच्या दिवशी धनादेशाऐवजी डिमांड ड्राफ्ट सादर करणे अनिवार्य आहे. उमेदवाराने पुढील कामकाजाच्या दिवशी धनादेशाऐवजी डिमांड ड्राफ्ट सादर न केल्यास त्याचा प्रवेश रद्द होऊ शकतो व त्यास उमेदवार स्वतः जबाबदार राहील.

- अनिवासी भारतीय उमेदवारांनी उमेदवाराच्या पात्रतेची पडताळणी करण्यासाठी २२/१०/२०२६ पूर्वी Foreign Candidate Registration Portal वर नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यानंतरचे वेळापत्रक वरीलप्रमाणेच लागू राहील.

- अनिवासी भारतीय उमेदवारांना गुणवत्तेनुसार फक्त १५% अनिवासी भारतीय जागांसाठीच प्रवेश घेण्याची पात्रता राहील.

सर्व उमेदवारांनी प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील सूचना, अद्ययावत माहिती व पुढील निर्देशांसाठी अधिकृत संकेतस्थळ www.mahacet.org ला नियमित भेट द्यावी.

या सूचनेच्या मराठी व इंग्रजी आवृत्तींमध्ये कोणतीही तफावत अथवा विसंगती आढळल्यास, इंग्रजी आवृत्ती अंतिम व बंधनकारक राहील.

स्वाक्षरी/-<br>
आयुक्त,<br>
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा<br>
(सीईटी) कक्ष, मुंबई